# अर्थजगत

**भारतीय भांडवली बाजारातील नियमन नेहमीच काटेकोर राहिले आहे, विशेषतः जेव्हा त्याचा संबंध सर्वसामान्य गुंतवणूकदारांच्या पैशाशी येतो तेव्हा बाजार नियामक संस्था म्हणजेच सेबी, प्रसंगी कठोर उपाय योजण्यासही मागेपुढे पहात नाही. सध्या सेबीच्या अशाच एका निर्णयामुळे देशातील म्युच्युअल फंड उद्योगांमध्ये काहीसे नाराजीचे वातावरण पसरले आहे. अलीकडेच सेबीने म्युच्युअल फंडांना प्री–आयपीओ शेअर्समध्ये (म्हणजेच एखादी कंपनी सार्वजनिक होण्याआधी खासगी पद्धतीने विकले जाणारे शेअर्स) गुंतवणूक करण्यास बंदी घातली आहे. या निर्णयाने गुंतवणूकदार संरक्षण आणि गुंतवणूक स्वातंत्र्य या दोन मुद्द्यांमधील संघर्ष पुन्हा चर्चेत आला आहे.**

## प्री-आयपीओ बंदी आणि म्युच्युअल फंड




एखादी कंपनी शेअर बाजारात सूचीबद्ध होण्यापूर्वी म्हणजेच आयपीओ (इनिशियल पब्लिक ऑफरींग) येण्याआधी, ती काही समभाग म्युच्युअल फंड, विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदार आणि फॅमिली ऑफिसेस ह्यांसारख्या मोठ्या संस्थात्मक गुंतवणूकदारांना खासगी करारांद्वारे विकते. यालाच प्री–आयपीओ गुंतवणूक म्हणून ओळखले जाते. ही प्रक्रिया कंपनीला गुंतवणूकदारांचा प्रतिसाद जाणून घेण्यासाठी आणि शेअरच्या किमतीसाठी योग्य श्रेणी ठरवण्यासाठी मदत करते. अशा प्री–आयपीओ डील्स सहसा आयपीओच्या किंमतीपेक्षा काही प्रमाणात सवलतीत मिळतात ह हीच बाब म्युच्युअल फंडांसाठी आकर्षक ठरते.

याशिवाय, अशा गुंतवणुकीसाठी सखोल मूल्यांकन आवश्यक असते. त्यामध्ये संस्थात्मक गुंतवणूकदार पारंगत असतात. त्यामुळे या प्रकारच्या गुंतवणुकींनी ऐतिहासिकदृष्ट्या फंड हाऊसेसना चांगले परतावे दिले आहेत. तसेच किरकोळ गुंतवणूकदारांनाही याचा फायदा झालेला आहे. विद्यमान नियमांनुसार, म्युच्युअल फंड फक्त सूचीबद्ध किंवा लवकरच सूचीबद्ध होणाऱ्या सिक्युरिटीजमध्येच गुंतवणूक करू शकतात. परंतु प्री–आयपीओ शेअर्समध्ये एक मोठी अडचण आहे ह त्यांची लिस्टिंग तारीख निश्चित नसते. काही कारणास्तव जर कंपनीने आयपीओ आणण्याची तारीख पुढे ढकलली किंवा तो निर्णयच रद्द केला तर म्युच्युअल फंडांकडे अनलिस्टेड शेअर्स अडकून पडतात. अशा स्थितीत तरलता आणि मूल्यांकन या दोन्ही बाबतीत धोके निर्माण होतात. याच कारणामुळे सेबीने यावर बंदी आणली असून नियामकांच्या मते ही बंदी गुंतवणूकदारांच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे. फंड मॅनेजरांच्या कौशल्याबाबत सेबीला कसलीही अडचण नाही. सेबीला त्यांच्या गुंतवणुकींच्या स्वरूपावर आणि जोखमींच्या मर्यादांवर नियंत्रण आणायचे आहे.

असे असले तरी फंड हाऊसेस मात्र याला अन्यायकारक निर्बंध मानत आहेत. याचे कारण प्री–आयपीओ मार्केटमुळे त्यांना दोन महत्त्वाचे फायदे मिळत होते. एक म्हणजे आकर्षक प्रवेश किंमत आणि उच्च मागणी असलेल्या कंपन्यांमध्ये आधीच निश्चित वाटा (ॲलोकेशन). त्यांच्या मते, याच टप्प्यांवर खऱ्या अर्थाने 'प्राईस डिस्कव्हरी' म्हणजे मूल्यनिर्धारण होते. अशा व्यवहारांमध्ये संस्थात्मक सहभाग असल्यानं बाजारभाव अधिक वास्तववादी ठरतो. फंड हाऊसेसचे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे आधीपासूनच जोखीम व्यवस्थापनाची काटेकोर प्रणाली आहे आणि अशा व्यवहारांवरील अंतर्गत देखरेख सशक्त आहे. त्यामुळे सर्व फंडांना एकाच चौकटीत बसवणे हे काहीसे अन्यायकारक आहे. याशिवाय, परदेशी गुंतवणूकदार आणि फॅमिली ऑफिसेस यांना अशा गुंतवणुकींमध्ये भाग घेण्याची परवानगी कायम ठेवल्यामुळे देशांतर्गत फंडांना तुलनात्मकदृष्ट्या मागे टाकले जात असल्याचे फंड हाऊसेसचे म्हणणे आहे. भारताचा म्युच्युअल फंड उद्योग जागतिक मानकांनुसार आधीच कठोर नियामक चौकटीत कार्य करतो. परदेशातील फंडांप्रमाणे त्यांना खाजगी गुंतवणुकींच्या किंवा पर्यायी मालमत्तांच्या संधी फारशा उपलब्ध नाहीत. प्री–आयपीओ गुंतवणूक हा एकमेव मार्ग होता ज्याद्वारे ते आपल्या गुंतवणूकदारांना जास्तीचा परतावा देऊ शकत होते आणि पोर्टफोलिओ इतरांपेक्षा वेगळे ठेवू शकत होते. आता या दारावर कुलूप बसवून सेबीने नकळत गुंतवणूकदार संरक्षण या नावाखाली नवोपक्रम रोखला आहे, असे अनेक तज्ञांचे मत आहे. उद्दिष्ट योग्य असले तरी याचे परिणाम उलट दिशेने जाऊ शकतात. तज्ज्ञांच्या मते सेबीने या क्षेत्रात पूर्ण बंदी घालण्याऐवजी सूक्ष्म आणि टप्प्याटप्प्याने नियम आखले पाहिजेत. उदाहरणार्थ, ज्या कंपन्यांनी सेबीकडे ड्राफ्ट रेड हेरींग प्रॉस्पेक्टसह(डीआरएचपी) दाखल केलेले आहे, त्या कंपन्यांमध्ये गुंतवणुकीची परवानगी असायला हवी. तसेच कंपन्यांना एखाद्या निश्चित कालावधीतच आयपीओ आणणे बंधनकारक करता येऊ शकेल. याशिवाय असूचीबद्ध शेअर्सच्या मूल्यांकनाची पारदर्शक पद्धत व तफावत स्पष्टपणे उघड करणे बंधनकारक करावे. अशा पद्धतीने सेबी गुंतवणूकदारांचे हितसुद्धा सुरक्षित ठेवू शकेल आणि म्युच्युअल फंड उद्योगालाही स्पर्धात्मक संधी देऊ शकेल.

***सेबीची भूमिका गुंतवणूकदारांच्या संरक्षणासाठी योग्य आहे, परंतु तिचा अंमलबजावणीचा मार्ग अधिक समतोल असायला हवा. म्युच्युअल फंड उद्योग हा भारताच्या आर्थिक प्रवासातील महत्त्वाचा स्तंभ आहे, आणि त्याला नव्या गुंतवणूक संधींपासून वंचित ठेवणे म्हणजे स्वतःच्या भांडवली बाजाराच्या वाढीला ब्रेक लावणे. नियमन आणि नवोपक्रम यांचा समतोल राखला गेला, तरच भारतीय म्युच्युअल फंड उद्योग खऱ्या अर्थाने जागतिक पातळीवर स्पर्धा करू शकेल.***

## विमा पोर्ट केल्यानंतर क्लेम करताय?




आरोग्य विमा कंपनी बदलणे म्हणजेच 'पोर्टिंग' ही कल्पना आज अनेकांना आकर्षक वाटते. प्रीमियम कमी, सेवा सुधारलेली किंवा कव्हरेज अधिक असेल या अपेक्षेने लोक कंपनी बदलण्याचा निर्णय घेतात. परंतु, फक्त कंपनी बदलल्यानेच काम संपत नाही. कारण क्लेम मंजूर होईल की नाही, हे अनेक सूक्ष्म बाबींवर अवलंबून असते. योग्य माहिती, पूर्ण दस्तऐवज आणि अटींची स्पष्ट समज नसल्यास, क्लेम नाकारला जाण्याची शक्यता प्रचंड असते. विमाधारकांना वाटते की, त्यांनी प्रीमियम भरला म्हणजे त्यांचा क्लेम हमखास मंजूर होईल. पण प्रत्यक्षात तसे नसते. विमा कंपनीकडे नियमांची शिस्तबद्ध चौकट असते. खालील कारणांमुळे अनेक दावे नाकारले जातात ह

- विमाधारकाने पूर्वीच्या आजारांविषयी प्रामाणिक माहिती दिली नाही, तर कंपनीला तो धोका म्हणून वाटतो आणि ती क्लेम नाकारते.
- पोर्टिंगच्या आधी सुरु केलेला उपचार नवीन कंपनी कव्हर करत नाही. कारण तो जुनी पॉलिसी सुरू असताना झालेला खर्च मानला जातो.
- प्रत्येक विमा कंपनीचे नियम आणि कव्हरेज पॉलिसीनुसार वेगळे असतात. जुन्या कंपनीकडून मिळालेला लाभ नवीन ठिकाणी आपोआप लागू होत नाही.
- नवीन कंपनी तुमच्या आरोग्यस्थितीचे स्वतंत्र मूल्यांकन करते आणि त्यावरूनच कोणता आजार कव्हर करायचा आणि कोणता नाही याचा निर्णय घेते.
- अपूर्ण रिपोर्टस, चुकीच्या तारखा किंवा पॉलिसीतील माहितीतील विसंगती यामुळेही क्लेम रिजेक्ट होतो. प्रत्येक आरोग्य विमा पॉलिसीमध्ये काही आजारांवर ठराविक वेटिंग पिरीयड (प्रतीक्षा कालावधी) असतो. उदाहरणार्थ, काही आजारांवर तीन वर्षांचा वेटिंग पिरीयड असेल, तर त्या काळात त्या आजारासाठी क्लेम मिळत नाही. एखाद्याने दोन वर्षे जुनी पॉलिसी पोर्ट केली, तर नवीन कंपनी बाकीचा एक वर्षाचा कालावधी पुन्हा मोजू शकते. त्यामुळे विमाधारकाने हे आधीच स्पष्ट करून घ्यायला हवे की जुन्या पॉलिसीतील वेटिंग पिरीयड कितपत ट्रान्सफर होत आहे. पोर्टिंग ही सुविधा योग्य वापरली तर ती विमाधारकासाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकते. यामुळे ग्राहकाला अधिक चांगले कव्हरेज, कमी प्रीमियम आणि उत्तम ग्राहकसेवा मिळू शकते. आरोग्य विमा क्षेत्रातील स्पर्धेमुळे कंपन्यांमध्ये सुधारणा होत राहतात आणि ग्राहकांना पर्याय उपलब्ध होतात. परंतु, या प्रक्रियेत फायदा मिळवण्यासाठी स्पष्टता, पारदर्शकता आणि जागरूकता या तीन गोष्टी अनिवार्य आहेत. चुकीची माहिती, अपूर्ण कागदपत्रे आणि नियमांची अज्ञानता या सर्व गोष्टी एकत्र येऊन क्लेम नाकारला जाण्याचे मोठे कारण बनतात.

**क्लेम नाकारला जाऊ नये, यासाठी काय करावे?**

- पोर्टिंग करताना सर्व माहिती प्रामाणिकपणे आणि पूर्णपणे द्या.
- जुन्या पॉलिसीची कागदपत्रे, मेडिकल रिपोर्ट्स आणि क्लेम हिस्ट्री व्यवस्थित सांभाळा.
- नवीन कंपनीकडून लिखित स्वरूपात विचारणा करा की कोणते वेटिंग पिरीयड ट्रान्सफर झाले आहेत.
- जर उपचार सुरू असेल किंवा शस्त्रक्रिया नियोजित असेल, तर आधी नवीन कंपनीकडून कव्हरेजची पुष्टी घ्या.
- सर्व संवाद आणि दस्तऐवज स्पष्ट ठेवा, जेणेकरून पुढे गैरसमज होणार नाही. ◆◆◆

## 'लेन्सकार्ट'च्या आयपीओत गुंतवणूक करताय?

भारतातील अग्रगण्य आयवेअर ब्रँड लेन्सकार्ट शेअर बाजारात पदार्पण करण्यास सज्ज झाला आहे. अनेक महिन्यांपासून प्रतीक्षा असलेल्या या बहुचर्चित आयपीओला शेवटी हिरवा कंदील मिळाला असून, कंपनीने आपल्या सार्वजनिक समभाग विक्रीसाठीचा प्राईस बँड ३८२ ते ४०२ रुपये असा निश्चित केला आहे. शुक्रवार, ३१ ऑक्टोबरपासून सुरू झालेली ही प्रक्रिया ४ नोव्हेंबरपर्यंत खुली राहील. लेन्सकार्टने ७,२७८ कोटी रुपयांच्या या प्रस्तावाद्वारे सुमारे ६९,७०० कोटींचे मूल्यांकन (व्हॅल्युएशन) साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. कंपनीचा उद्देश केवळ देशांतर्गत बाजारात नव्हे, तर आग्नेय आशिया आणि मध्यपूर्वेसारख्या जागतिक बाजारातही आपली पकड मजबूत करण्याचा आहे.

**आयपीओची रचना :** या सार्वजनिक प्रस्तावात २,१५० कोटी रुपयांचे नवीन समभाग (फ्रेश इश्यू) जारी केले जातील, तर उर्वरित ५,१२८ कोटी रुपये ऑफर फॉर सेल अंतर्गत प्रमोटर्स आणि गुंतवणूकदारांकडून विक्रीतून मिळतील. या अंतर्गत एकूण १२.७५ कोटी समभाग बाजारात विकले जातील. कंपनीचे संस्थापक पियूष बंसल, नेहा बंसल, अमित चौधरी आणि सुमीत कपाही, तसेच सॉफ्टबँक, टेमासेक, केदारा कॅपिटल आणि अल्फा वेव्ह व्हेंचर्स यांसारखे गुंतवणूकदार यामध्ये आपली हिस्सेदारी कमी करतील. सेबीच्या नियमांनुसार, या प्रस्तावातील ७५ टक्के हिस्सा पात्र संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी, १५ टक्के हिस्सा बिगर–संस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी आणि १० टक्के हिस्सा किरकोळ गुंतवणूकदारांसाठी राखून ठेवण्यात आला आहे. पात्र कर्मचाऱ्यांना दर समभागावर १९ रुपयांची सवलत देण्यात येत आहे.

**लॉट साईज आणि गुंतवणुकीची रक्कम :** या आयपीओचा लॉट साइज ३७ समभागांचा आहे. म्हणजेच किरकोळ गुंतवणूकदारांना किमान ३७ शेअर्ससाठी अर्ज करावा लागेल. त्यासाठी सुमारे १४,८७४ रुपयांची किमान गुंतवणूक आवश्यक असेल.



**शेअर वाटप आणि लिस्टिंग :** लेन्सकार्टच्या समभागांचे वाटप ६ नोव्हेंबर रोजी निश्चित होण्याची शक्यता आहे. पात्र गुंतवणूकदारांच्या डिमॅट खात्यात शेअर्स ७ नोव्हेंबर रोजी जमा केले जातील, तर अपात्र गुंतवणूकदारांना त्या दिवशीच पैसे परत केले जातील. शेवटी, कंपनीचे शेअर्स १० नोव्हेंबर रोजी बीएसई आणि एनएसईवर लिस्ट होतील.

**जोखीम घटक** : लेन्सकार्टचा व्यवसाय आकर्षक असला तरी त्यात काही जोखीमेही आहेत. पहिली बाब म्हणजे आयातीवर अवलंबित्व. हकंपनी आपल्या फ्रेम्स आणि काही कच्चा माल चीनमधून मागवते. चीनमधील बोआर्फेंग फ्रेमकार्ट टेक नावाच्या संयुक्त उपक्रमात लेन्सकार्टची ५१ टक्के हिस्सेदारी आहे. जर चीनमधील पुरवठा साखळीवर परिणाम झाला, तर कंपनीच्या उत्पादन आणि विक्रीवर थेट परिणाम होऊ शकतो.

दुसरी जोखीम म्हणजे तांत्रिक प्रगतीचा प्रभाव. लॅसिक सर्जरी, स्माईल सर्जरी, लेझर सर्जरीसारख्या आधुनिक पद्धती गेल्या काही वर्षांत लोकप्रिय होत आहेत. या तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यास चष्म्यांच्या मागणीवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो.

तिसरी जोखीम म्हणजे फ्रँचायझीवरील नियंत्रणाचा अभाव. लेंसकार्टचे सुमारे २२ टक्के रिटेल स्टोअर्स फ्रँचायझी मॉडेलवर चालतात. कंपनीकडे या फ्रँचायझींवर पूर्ण आर्थिक किंवा कार्यकारी नियंत्रण नाही. त्यामुळे एखाद्या फ्रँचायझीकडून चुकीचा व्यवहार झाला, तर ब्रँडच्या प्रतिमेला धक्का लागू शकतो, असे जाणकारांचे म्हणणे आहे.

**कंपनीची आर्थिक स्थिती :** वित्त वर्ष २०२५ मध्ये लेन्सकार्टने २९७ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला, जो मागील वर्षाच्या तुलनेत मोठी झेप होती ह कारण २०२४ मध्ये कंपनीला १० कोटी रुपयांचा तोटा झाला होता. उत्पन्नात २२ टक्क्यांची वाढ झाली असून ते ६,६२५ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. देशात कंपनीचे २,०६७ स्टोअर्स आहेत, तर परदेशात ६५६ स्टोअर्स कार्यरत आहेत.

**गुंतवणूकदारांसाठी याचा अर्थ काय?**

लेन्सकार्टचा आयपीओ तंत्रज्ञान, रिटेल आणि ब्रँड वैविध्य यांचा अनोखा संगम आहे. कंपनीचे वितरण जाळे मजबूत आहे आणि ग्राहकांचा विश्वास मोठ्या प्रमाणात मिळवला आहे. मात्र, ती जागतिक बाजारातील स्पर्धा, पुरवठा साखळीतील जोखीम आणि तांत्रिक बदल या सर्वांवर अवलंबून राहते. त्यामुळे हा प्रस्ताव दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी उपयुक्त ठरू शकतो, पण अल्पकालीन नफ्यासाठी काही प्रमाणात जोखीम स्वीकारावी लागेल.

लेन्सकार्टचा आयपीओ केवळ एका आयवेअर कंपनीचा बाजारात प्रवेश नाही, तर भारतीय स्टार्टअप इकोसिस्टमसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. डिजिटलायझेशन, ब्रँडिंग आणि जागतिक विस्ताराच्या यशस्वी रणनीतींचा हा एक आदर्श नमुना आहे. ◆◆◆

## बँक शेअर्सवरील वेटेज मर्यादा बदलणार बाजाराचा खेळ

भारतीय भांडवली बाजारात मोठा बदल घडवणारा निर्णय बाजार नियंत्रक संस्था सेबीने घेतला आहे. विशेषतः बँकिंग क्षेत्रातील निर्देशांक म्हणजे बँकनिफ्टी, फिननिफ्टी आणि बँकेक्स या तीनही निर्देशांकांवर या निर्णयाचा परिणाम होणार आहे. सेबीच्या या निर्णयानुसार, कोणत्याही एका बँकेचे वजन (वेटेज) आता निर्देशांकांमध्ये २० टक्क्यांपेक्षा अधिक राहू शकत नाही आणि सर्वात मोठ्या तीन बँकांचे एकत्रित वजन ४५ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहील. सेबीच्या या सुधारणांमुळे शेअर बाजारातील बँकिंग निर्देशांकांचे स्वरूप, त्यातील अस्थिरता आणि गुंतवणूकदारांचे धोरण ह या सर्वांमध्ये मोठे बदल दिसतील.

आतापर्यंत बँकिंग निर्देशांकांची दिशा काही मोजक्या मोठ्या बँकांवर अवलंबून होती. एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक किंवा भारतीय स्टेट बँक यांसारख्या बँकांचा वाटा इतका मोठा होता की त्यांच्या शेअर किमतींमधील थोडासा बदलदेखील संपूर्ण निर्देशांकाला वर–खाली करत असे. त्यामुळे बाजारातील संतुलन बिघडत होते आणि गुंतवणूकदारांच्या परताव्यांमध्ये अनावश्यक चढउतार दिसत होते. सेबीला या एकसंधतेऐवजी विविधतेला प्रोत्साहन द्यायचे आहे. यामागे निर्देशांक अधिक संतुलित, पारदर्शक आणि वास्तव स्वरूप दाखवणारा व्हावा, हे सेबीचे उद्दिष्ट आहे.

**नव्या नियमांनुसार आता प्रत्येक बँकिंग** निर्देशांकात किमान १४ बँकांचे शेअर्स असणे बंधनकारक असेल. कोणत्याही एका बँकेचा वाटा २० टक्क्यांपेक्षा जास्त असू शकत नाही आणि पहिल्या तीन बँकांचे मिळून एकूण वजन ४५ टक्क्यांवर थांबवावे लागेल. त्यामुळे कोणतीही एक बँक निर्देशांकावर हुकूमत गाजवू शकणार नाही. या नियमांमुळे निर्देशांक खऱ्या अर्थाने विविधीकृत (डायव्हर्सिफाईड) होतील आणि एखाद्या मोठ्या बँकेच्या घसरणीने संपूर्ण बँकिंग निर्देशांक कोसळणार नाही.




सेबीच्या परिपत्रकानुसार हे बदल टप्प्याटप्प्याने लागू केले जातील. बँकनिफ्टीसाठी ही प्रक्रिया चार टप्प्यांत पूर्ण केली जाईल, जेणेकरून बाजारातील गुंतवणूकदारांना अचानक धक्का बसणार नाही. पहिल्या टप्प्यात ज्या बँकेचे वजन सध्या जास्त आहे ते थोडेसे कमी केले जाईल आणि पुढील प्रत्येक टप्प्यात ते क्रमाक्रमाने कमी करून २० टक्क्यांच्या मर्यादेपर्यंत आणले जाईल. प्रत्येक टप्प्यानंतर सेबी आणि संबंधित शेअर एक्सचेंज हे वेटेज पुन्हा तपासतील, जेणेकरून संतुलन राखले जाईल. बँकनिफ्टीमध्ये हे बदल मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होतील. दुसरीकडे बँकेक्स आणि फिननिफ्टीमध्ये हे बदल एकाच टप्प्यात म्हणजे डिसेंबर २०२५ पर्यंत लागू होतील.

**गुंतवणूकदारांवर थेट परिणाम**

या बदलांचा परिणाम गुंतवणूकदारांवर थेट होणार आहे. आता बँकनिफ्टी आणि फिननिफ्टी हे निर्देशांक पूर्वीपेक्षा कमी चढउतार असलेले म्हणजे कमी अस्थिरतेचे ठरतील. त्यामुळे ईटीएफ आणि निर्देशांक निधीमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना अधिक स्थिर आणि संतुलित परतावा मिळेल. एखाद्या मोठ्या बँकेच्या शेअरमध्ये पडझड झाली तरी संपूर्ण निर्देशांक त्यावर अवलंबून राहणार नाही. ट्रेडर्सना देखील अधिक विविधीकृत पोर्टफोलिओमध्ये व्यवहार करण्याची संधी मिळेल.

**सेबीचा हेतू**

सेबीचा हेतू म्हणजे बाजारात पारदर्शकता, न्याय्यपणा आणि विश्वास वाढवणे हा आहे. बँकिंग निर्देशांक आता केवळ काही बँकांच्या हालचालीवर नाही, तर संपूर्ण क्षेत्राच्या वास्तव कामगिरीवर आधारित राहतील. त्यामुळे हे नियम केवळ तांत्रिक सुधारणाच नव्हेत, तर गुंतवणूकदारांच्या हितासाठी केलेले धोरणात्मक पाऊल आहे. ◆◆◆

## सचिनने ५८ लाखांची करसवलत कशी मिळवली?

सन २००० च्या दशकाच्या सुरुवातीस सचिन तेंडुलकर केवळ क्रिकेटपटू नव्हता. तो ब्रँड सचिन बनला होता. प्रत्येक जाहिरातदाराला त्यांच्या चेहऱ्याची झलक हवी होती. ईएसपीएन, स्टार स्पोर्टस्, पेप्सी, व्हिसा, बूस्ट यांसारख्या सर्व आंतरराष्ट्रीय ब्रँडसाठी सचिनचे जाहिरात शूटस् परदेशात होत होते आणि त्या कामातून त्याला मोठ्या प्रमाणावर परकीय चलनात उत्पन्न मिळत होते. त्या काळात हे उत्पन्न एकूण सुमारे ५.९२ कोटी रुपये होते.




याच ठिकाणी त्याने कलम ८०आरआरचा वापर केला. आयकर कायद्यानुसार हे कलम लेखक, कलाकार, संगीतकार किंवा अभिनेते यांना परदेशातून मिळालेल्या उत्पन्नावर ३० टक्के वजावट देते. म्हणजेच जर तुमचे कलात्मक कार्य परदेशात झाले आणि त्यासाठी पैसे मिळाले, तर त्या रकमेतील थेट ३० टक्के भाग करमुक्त ठरतो.

सचिनने आपल्या कर विवरणपत्रात दाखवले की त्या जाहिरातींमधील काम हे 'क्रिकेट' नव्हे तर 'अभिनय' आहे. त्याने स्पष्ट केले की हे उत्पन्न मॉडेलिंग आणि ॲक्टिंग या व्यावसायिक स्वरूपातून मिळाले आहे आणि त्यामुळे ८०आरआरअंतर्गत वजावट लागू होते. परंतु आयकर विभागाने ही भूमिका मान्य केली नाही. त्यांचा युक्तिवाद होता की सचिन मुख्यतः क्रिकेटपटू आहे; जाहिराती हे त्याच्या क्रिकेट करिअरचे उपउत्पन्न आहे आणि त्यामुळे त्यावर कलाकार म्हणून सवलत मिळू शकत नाही.

हे प्रकरण पुढे आयकर अपीलीय न्यायाधिकरणापर्यंत गेले. तेथे मुख्य प्रश्न होता ह सचिनचा अभिनय हा कलात्मक प्रदर्शनात मोडतो का? आणि एकाच व्यक्तीला दोन वेगवेगळ्या व्यावसायिक ओळखी असू शकतात का?

न्यायाधिकरणाने या दोन्ही प्रश्नांवर महत्त्वाचा निर्णय दिला. त्यांनी नमूद केले की, अभिनय किंवा मॉडेलिंग हे सर्जनशील कल्पनाशक्ती, कौशल्य आणि सौंदर्यपूर्ण सादरीकरण यांचा संगम असलेले कार्य आहे. त्यामुळे जाहिरातीत सचिन जेव्हा कलाकार म्हणून परफॉर्म करतो तेव्हा तो एक स्वतंत्र 'कलात्मक व्यवसाय' ठरतो. न्यायाधिकरणाने पुढे स्पष्ट केले की एखाद्या व्यक्तीला एकापेक्षा अधिक व्यवसाय असू शकतात; सचिन क्रिकेटपटू म्हणून एक व्यवसाय करतो आणि कलाकार म्हणून दुसरा. त्यामुळे आयटीएटीने सचिनच्या बाजूने निकाल दिला आणि त्यांना ८०आरआरअंतर्गत ३० टक्के वजावट मंजूर केली. या वजावटीची एकूण रक्कम होती १.७७ कोटी रुपये. यामुळे सचिनच्या प्रत्यक्ष करामध्ये ५८ लाखांची बचत झाली.

हा निकाल केवळ एका खेळाडूच्या कर नियोजनाबद्दल नव्हे, तर भारतीय व्यावसायिकांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आदर्श ठरला. आज ग्लोबल प्लॅटफॉर्मवर काम करणारे इन्फ्लुएन्सर्स, यूट्यूबर्स, लेखक, संगीतकार किंवा कलाकार आपल्या परदेशी उत्पन्नावर कर नियोजन करताना या उदाहरणातून प्रेरणा घेऊ शकतात.

## भावनांवर नियंत्रण ठेवणारेच श्रीमंत होतात

जगप्रसिद्ध रिच डॅड पुअर डॅड या पुस्तकाचे लेखक आणि आर्थिक शिक्षणाचे समर्थक रॉबर्ट कियोसाकी यांनी पुन्हा एकदा संपत्तीबद्दलच्या पारंपरिक समजुतींना आव्हान दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील खरा फरक पैसा, नशिब किंवा शैक्षणिक पात्रता नसून भावनिक बुद्धिमत्ता (ईक्यू) आहे.

कियोसाकींच्या मते, भय हा लोकांना श्रीमंत होण्यापासून रोखणारा सर्वात मोठा अडथळा आहे. ज्यांना स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवता येत नाही, ते आयुष्यभर आर्थिकदृष्ट्या मागेच राहतात.



कियोसाकी यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, अनेक लोक आर्थिकदृष्ट्या अपयशी ठरतात ते ज्ञानाच्या अभावामुळे नव्हे, तर भावनांच्या प्रभावाखाली निर्णय घेतल्यामुळे. त्यांचे म्हणणे आहे की, ज्यांना हरण्याची भीती जिंकण्याच्या इच्छेपेक्षा जास्त असते, ते कधीच श्रीमंत होऊ शकत नाहीत. त्यांनी याबाबत एक उदाहरणही दिले आहे. काही वर्षांपूर्वी त्यांचा कॉईनबेस ॲपमध्ये असलेला बिटकॉइन पोर्टफोलिओ फारच छोटा होता, परंतु आज त्यात त्यांनी कोट्यवधी डॉलर्स कमावले आहेत. तरीसुद्धा, त्यांनी हा आकडा आपल्या एका मित्राला दाखवला, तेव्हा मित्राने त्या नफ्याकडे पाहण्याऐवजी गेल्या काही महिन्यांत झालेल्या थोड्याशा नुकसानीवरच लक्ष केंद्रित केले. कियोसाकींच्या मते, हीच मानसिकता श्रीमंत, मध्यमवर्गीय आणि गरीब यांच्यातील खरी रेषा आहे. एकाच आकड्याकडे बघताना एखाद्याला शक्यता दिसते, तर दुसऱ्याला धोका!

कियोसाकी स्पष्टपणे सांगतात की पैशाच्या व्यवहारात ईक्यू हा आयक्यूपेक्षा जास्त प्रभावी आहे, विशेषतः ज्यांच्याकडे उच्च आयक्यू असतो, तेही भावनिकदृष्ट्या कमजोर असतील, तर ते संपत्ती टिकवू शकत नाहीत. त्यांचे मत आहे की, गरीब आणि मध्यमवर्गीय लोक जिंकण्यापेक्षा हरण्याची भीती बाळगतात, त्यामुळे ते नेहमी सुरक्षिततेच्या कोंडीत अडकतात. हरण्याची भीतीच त्यांना मोठे विचार करू देत नाही. कियोसाकींच्या शब्दांत हलुझर्स हॅव लो ईक्यू. अपयशी ठरणाऱ्यांना स्वतःच्या भीती आणि लोभावर नियंत्रण ठेवता येत नाही.

कियोसाकी म्हणतात, भीती आणि लोभ हे दोन्ही भाव नैसर्गिक आहेत. पण यशस्वी लोक ते ओळखतात, समजून घेतात आणि त्यांच्यामुळे निर्णय बिघडू देत नाहीत. त्यांचे म्हणणे आहे की, ईक्यू आयक्यूपेक्षा अधिक सामर्थ्यवान आहे आणि म्हणूनच माझे 'पुअर डॅड' जे अत्यंत सुशिक्षित असूनही आर्थिकदृष्ट्या गरीब राहिले. त्यांनी पुढे लिहिले की, अनेक शिक्षक किंवा उच्चशिक्षित लोक आर्थिकदृष्ट्या संघर्ष करताना दिसतात. त्यांच्याकडे उच्च आयक्यू असते, पण ईक्यू कमी असतो.

**कियोसाकींचा सल्ला भावनांवर विजय मिळवा**

त्यांनी आपल्या पोस्टचा शेवट एका साध्या पण खोल अर्थ असलेल्या वाक्याने केला: जर तुम्हाला श्रीमंत आणि आनंदी व्हायचे असेल, तर तुमचा ईक्यू उच्च ठेवा ह म्हणजेच, तुमच्या भय आणि लोभापेक्षा तुम्ही स्वतः अधिक शहाणे व्हा.

रॉबर्ट कियोसाकी हे केवळ लेखक नाहीत, तर ते रिच डॅड कंपनी या शिक्षण संस्थेचे संस्थापक आणि आर्थिक स्वावलंबनाचे जागतिक प्रचारक आहेत. त्यांच्या रिच डॅड पुअर डॅड या पुस्तकाने जगभरातील कोट्यवधी लोकांच्या आर्थिक विचारसरणीत आमूलाग्र बदल घडवून आणला. त्यांच्या कॅशफ्लो या बोर्ड गेमद्वारे ते लोकांना आर्थिक साक्षरता आणि गुंतवणुकीतील निर्णयक्षमता शिकवतात. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू एकच पैशाबद्दल भीती बाळगू नका, त्याला समजून घ्या. ◆◆◆

# एक आरोग्य : मानव, प्राणी आणि पर्यावरणाच्या सुसंवादातून शाश्वत आरोग्याचा समाजशास्त्रीय मार्ग

३ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी 'एक आरोग्य दिन' (One Health Day) म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे महत्त्व केवळ वैद्यकीय परिघात मर्यादित नाही, तर तो सामाजिक, पर्यावरणीय आणि नैतिक जबाबदारीचा जागरूक संदेश देतो. आजच्या जगात माणसाचे आरोग्य हे स्वतंत्रपणे समजून घेणे अशक्य झाले आहे. कारण मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे जीवन परस्परांशी घट्ट गुंतलेले आहे. 'एक आरोग्य' ही संकल्पना याच परस्परसंबंधाचा विचार करून सांगते की पृथ्वीवरील सर्व सजीव आणि त्यांच्या परिसरातील नातेसंबंध हे आरोग्याच्या मूळ गाभ्याशी निगडित आहेत. म्हणजेच मानवाचे आरोग्य प्राण्यांच्या आणि पर्यावरणाच्या आरोग्याशी अविभाज्य आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता ही संकल्पना केवळ वैद्यकीय नव्हे तर सामाजिक रचना, संस्कृती, अर्थव्यवस्था, पर्यावरणीय नीती आणि मानवी वर्तन यांचा समग्र आरसा बनते.

'एक आरोग्य' (One Health) ही संकल्पना जागतिक आरोग्य संघटना (WHO), जागतिक प्राणी आरोग्य संघटना (WOH), संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटना (FAO) आणि संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP) यांनी संयुक्तपणे विकसित केली आहे. या तत्त्वानुसार मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे आरोग्य एकमेकांवर अवलंबून आहे, आणि कोणत्याही घटकातील असमतोल संपूर्ण जगाच्या आरोग्य साखळीला धोक्यात आणतो. याचे अत्यंत ठळक उदाहरण म्हणजे 'कोविड-१९' महामारी, जी प्राण्यांकडून मानवाकडे पसरलेल्या झूनोटिक रोगाचे द्योतक ठरली. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, सुमारे ६० टक्क्यांहून अधिक संसर्गजन्य रोग हे प्राण्यांकडून मानवाकडे पसरणारे म्हणजेच झूनोटिक रोग आहेत. समाजशास्त्रीय विश्लेषणात हे दिसते की या रोगांचा प्रसार केवळ जैविक कारणांमुळे नसून, मानवी वर्तन, पर्यावरणाचा नाश, जंगलतोड, औद्योगिकीकरण, शहरीकरण, आणि प्राण्यांच्या अधिवासात मानवी हस्तक्षेप यांमुळेही होतो.

आजच्या काळात आरोग्याच्या प्रश्नांकडे समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर अनेक परस्पर-संबंध उलगडतात. समाजशास्त्र सांगते की आरोग्य हे केवळ आजार नसण्याची स्थिती नाही, तर शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलनाची अवस्था आहे. ही अवस्था समाजातील मूल्यव्यवस्था, आर्थिक परिस्थिती, शिक्षण, लिंगसमानता, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक आचारांवर अवलंबून असते. उदा. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि पोषणाची कमतरता ही केवळ वैद्यकीय समस्या नसून ती सामाजिक असमानतेचे प्रतिबिंब आहे. त्याचप्रमाणे शहरी भागातील प्रदूषण, ध्वनीकल्लोळ, आणि मानसिक ताणतणाव हे आधुनिक जीवनपद्धतीचे उपउत्पादन आहेत. त्यामुळे 'एक आरोग्य'ची कल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्याला सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीच्या चौकटीत बसवते.

भारतीय परंपरेतही 'एक आरोग्य'सदृश विचारांचे दर्शन होते. प्राचीन ग्रंथांमध्येही मानव आणि निसर्गाच्या सुसंवादाला सर्वोच्च स्थान दिले गेले आहे. मानवाचे आरोग्य आणि विश्वाचे संतुलन एकसंध मानले गेले आहे. वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना पृथ्वीवरील सर्व सजीव एकाच कुटुंबाचे घटक असल्याचा संदेश देते. परंतु औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या अतिरेकामुळे मानवाने निसर्गाच्या सहजीवनाची ही मूल्यव्यवस्था विसरली आहे. परिणामतः पर्यावरणीय ऱ्हास, जलवायू बदल, हवामानातील अस्थिरता, अन्नसाखळीतील विषारी रासायनिक हस्तक्षेप, तसेच प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाचा नाश या सर्वांनी मानवाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम केला आहे.

'एक आरोग्य' दृष्टीकोन समाजात शाश्वत आणि न्याय्य आरोग्यव्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय ठेवतो. तो आरोग्याचा प्रश्न केवळ डॉक्टर-रुग्ण संबंधात मर्यादित न ठेवता, शासन, शिक्षण, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि नागरिक जबाबदारी या सर्व क्षेत्रांत पसरवतो. समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार आरोग्यविषयक असमानता ही सामाजिक विषमतेशी थेट संबंधित आहे. गरीब, महिला, आदिवासी, स्थलांतरित मजूर आणि ग्रामीण समाजातील दुर्बल घटक हे आरोग्य संकटांचे सर्वाधिक बळी ठरतात. त्यांना स्वच्छ पाणी, पोषण, आणि आरोग्यसेवा मिळविण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक अडथळ्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे 'एक आरोग्य' ही संकल्पना सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची ठरते.

पर्यावरणीय असंतुलन हा आरोग्याचा सर्वात मोठा सामाजिक धोका बनला आहे. वृक्षतोड, प्लास्टिक संस्कृती, रासायनिक शेती, प्रदूषण आणि औद्योगिक कचरा यांमुळे माती, पाणी आणि हवा दूषित झाली आहे. या प्रदूषणामुळे श्वसनाचे विकार, त्वचारोग, कर्करोग, अन्नातील विषारी घटक, तसेच मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे घटक वाढले आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोन सांगतो की हे केवळ पर्यावरणीय नव्हे तर आर्थिक आणि नैतिक प्रश्न आहेत, कारण या परिस्थितीचा सर्वाधिक फटका दुर्बल वर्गांना बसतो. 'एक आरोग्य' या दृष्टीकोनातून समाजाला पर्यावरणीय न्यायाची नवी संकल्पना मिळते, जिथे प्रत्येक व्यक्तीला निरोगी वातावरणात जगण्याचा अधिकार मिळतो.

ग्रामीण भारतात अजूनही आरोग्य आणि पशुवैद्यकीय सेवा वेगळ्या पातळीवर कार्य करतात. परंतु 'एक आरोग्य' संकल्पनेनुसार मानव, प्राणी आणि पर्यावरण या तिन्ही घटकांचे आरोग्य एकत्रित विचारात घेतल्याशिवाय झूनोटिक रोगांना रोखता येणार नाही. उदा. दुधाळ प्राण्यांचे लसीकरण, कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याचे परीक्षण, शेतीतील रासायनिक वापर यांचे एकत्रित नियोजन केल्यास मानव आणि प्राण्यांच्या आरोग्यावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होऊ शकतो. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य विभाग, पशुवैद्यक तज्ञ, पर्यावरणतज्ज्ञ आणि समाजकार्यकर्ते यांचे एकात्मिक सहकार्य आवश्यक आहे.

'एक आरोग्य'चा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे मानसिक आरोग्य. आधुनिक जीवनशैली, प्रदूषण, नोकरीतील अस्थिरता, सामाजिक एकाकीपण आणि नैसर्गिक संसाधनांपासून तुटलेला मानवी संबंध हे सर्व मानसिक असंतुलनाचे कारण बनले आहे. संशोधन दर्शविते की निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या समाजांमध्ये मानसिक आरोग्य अधिक संतुलित असते. त्यामुळे समाजशास्त्रीय पातळीवर मानसिक आरोग्याचे आणि पर्यावरणाशी असलेल्या नात्याचे पुनर्संयोजन करणे आवश्यक आहे.

'एक आरोग्य दिन' आपल्याला शाश्वत विकास उद्दिष्टांची आठवण करून देतो. संयुक्त राष्ट्रांच्या २०३० टिकाऊ विकास कार्यक्रमात आरोग्य आणि कल्याण, स्वच्छ पाणी आणि स्वच्छता, हवामान कृती, आणि जमिनीवरील जीवन ही उद्दिष्टे 'एक आरोग्य'च्या तत्त्वांशी थेट जोडलेली आहेत. हे केवळ जागतिक ध्येय नसून प्रत्येक देश, राज्य, आणि गावाच्या स्तरावर अंमलात आणण्याजोगे मार्गदर्शक तत्त्व आहे. शालेय शिक्षणापासून ते आरोग्यसेवा, कृषी आणि उद्योग क्षेत्रापर्यंत या संकल्पनेचे सामाजिक आकलन झाल्यास 'आरोग्यपूर्ण समाज' निर्माण होऊ शकतो.

समाजशास्त्रीय विश्लेषणात 'एक आरोग्य' ही संकल्पना मानवाच्या वर्तनातील बदलाचे आवाहन करते. ती सांगते की आरोग्याचा प्रश्न फक्त वैयक्तिक जबाबदारीचा नाही, तर सामाजिक एकत्रिकतेचा आहे. आपल्या आहाराच्या सवयी, उपभोग संस्कृती, कचरा व्यवस्थापन, जलस्रोतांचे संरक्षण, जैवविविधतेचे जतन आणि प्राण्यांविषयी संवेदनशीलता या सर्व गोष्टी समाजाच्या आरोग्यदृष्टीला आकार देतात. म्हणूनच 'एक आरोग्य' ही एक चळवळ बनली पाहिजे, जी व्यक्तीच्या आरोग्यापलीकडे जाऊन पृथ्वीच्या आरोग्याचे संरक्षण करेल.

शेवटी, 'एक आरोग्य दिन' हा मानवतेच्या परस्परसंबंधांचा सण आहे. तो आपल्याला स्मरण करून देतो की माणूस निसर्गापासून वेगळा नाही. पृथ्वी, प्राणी, वनस्पती, हवा, पाणी आणि मानव हे सर्व एकाच जीवनसाखळीचे घटक आहेत. या साखळीतील कोणताही घटक दुर्लक्षित झाला, तर संपूर्ण आरोग्यव्यवस्था असंतुलित होते. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्याचा विचार करताना समता, न्याय, सहजीवन आणि पर्यावरणीय जबाबदारी हे मूलभूत तत्त्व ठरतात. 'एक आरोग्य' म्हणजे आरोग्याचा सर्वसमावेशक लोकशाही मार्ग होय. जिथे विज्ञान, समाज, निसर्ग आणि मानवता एकत्र येऊन शाश्वत जग निर्माण करतात.

३ नोव्हेंबरचा 'एक आरोग्य दिन' साजरा करणे म्हणजे केवळ आरोग्याचा दिवस पाळणे नव्हे, तर मानवाने आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे. आपले आरोग्य, प्राण्यांचे आरोग्य आणि पर्यावरणाचे आरोग्य हे तिन्ही एका सूत्रात बांधलेले आहेत, या जाणिवेनेच खऱ्या अर्थाने एक आरोग्य साकार होईल. कारण शेवटी, मानवाचे आरोग्य पृथ्वीच्या आरोग्यापासून वेगळे नाही; ते दोन्ही एकाच अस्तित्वाच्या दोन बाजू आहेत.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)



शहराच्या डीप क्लीन स्वच्छता मोहिमेअंतर्गत आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी सकाळ पासून सक्कर चौक ते कोठला या भागात विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, माजी नगरसेवक, समाजिक कार्यकर्ते व नागरिक यांच्यासह मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. (छाया : लहू दळवी)

# इंदोर प्रमाणे आपल्या नगर शहराला स्वच्छ सुंदर करणे हाच ध्यास व उद्देश

### आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन, तिसऱ्या दिवशी डीप क्लीन स्वच्छता मोहीमेमुळे परिसर चकाचक

नगर – नगर शहराला जसे विकासाच्या दिशेने मी नेत आहे तसेच आता आपल्या नगरला स्वच्छ व सुंदर शहराचा दर्जा मिळवून द्यायचा आहे. देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून ओळख असलेल्या इंदोर शहराचा आदर्श घेऊन त्या शहराप्रमाणे आपल्या नगरला स्वच्छ सुंदर करणे हाच ध्यास व उद्देश आहे. नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होत आपले घर, परिसर, कॉलनी व प्रभाग स्वच्छ व सुंदर ठेवल्यास हे उद्दिष्ट गाठणे सहज शक्य होईल. आता डीप किल्न मोहिमेमुळे शहर स्वच्छतेच्या दिशेने वाटचाल करत आहे. यापुढील काळात जे रस्त्यवर कचरा टाकतील त्यांच्यावर आता दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी कचरा घंटागाडीतच टाकून महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आ.संग्राम जगताप यांनी करून येणाऱ्या काळात होणाऱ्या महानगरपालिका निवडणुका व या स्वच्छता अभियानाचा काही एक संबध नाही, असेही आ.संग्राम जगताप यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर शहराच्या डीप क्लीन स्वच्छता मोहिमेसाठी आ.संग्राम जगताप यांनी पुढाकार घेत भूमिका घेतली आहे. या मोहिमे अंतर्गत सोमवारी सकाळ पासून सक्कर चौक ते कोठला या भागात विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यासाठी आ.जगताप सकळी ७ वाजल्यापासून उपस्थित होत मनपाच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना सूचना व आदेश दिले. यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे व परिसरातील माजी नगरसेवक, समाजिक कार्यकर्ते व नागरिक यांच्यासह मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी शक्कर चौकातील रस्त्यामधील दुभाजकांच्या कडेला व खालील माती व कचरा साफ करण्यात आला. तसेच बंद गटारीचे चेंबर उघडून त्यातील गाळ, माती, मोठे दगडं काढून स्वच्छता करण्यात आली. रस्त्याच्या कडेला वाढलेली झाडे, गावात काढून अतिक्रमणे व टपऱ्याही काढण्यात आल्या. या विशेष अभियानामुळे सक्कर चौक ते कोठला रोड परिसर स्वच्छ व चकाचक झाल्याने परिसरातील नागरिकांनी मोठे समाधान व्यक्त केले.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी आवाहन केले की, ज्या नागरिकांचे रस्त्यंवर अतिक्रमणे आहेत ते त्यांनी स्वतःहून काढून घ्यावेत अन्यथा महानगरपालिका त्यांच्यावर कडक कारवाई करणार आहे. तसेच रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवरही कठोर कारवाई करणार आहोत. शहराच्या स्वच्छतेसाठी सर्व नागरिकांनी मनपाला सहकार्य करावे.

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक संजय चोपडा व प्रकाश भागानगरे, कमलेश भंडारी, गोरख पडोळे, उपायुक्त संतोष इंगळे, प्रभाग अधिकारी एस. बी. तडवी आदींसह नागरिक या मोहिमेत सहभागी झाले होते.



सिंधी समाजाचे श्रद्धास्थान असणाऱ्या भगवान झुलेलाल व सिंधी समाजाविषयी आक्षेपार्ह विधान करणाऱ्यावर कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देताना समाज बांधव.

# सिंधी समाजाविषयी आक्षेपार्ह विधान करणाऱ्यावर कारवाई करा

### समाजाच्या शिष्टमंडळाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – सिंधी समाजाचे श्रद्धास्थान असणाऱ्या भगवान झुलेलाल व सिंधी समाजाविषयी आक्षेपार्ह विधान करणाऱ्या छत्तीसगड येथील अमित बघेल याच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी यासाठी समस्त सिंधी समाजाच्या वतीने अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी विकी आहूजा, जेऊ रंगलानी, मयूर मुलतानी, शंकर, इंद्र बजाज, जय भोसले, जितू सरदार, प्रदीप आहूजा, महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, कैलास नवलानी, मनीष नवलानी, पियुष वदवाणी, भरत नवलानी आदीसह सिंधी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

याबाबत हकीकत अशी की दोन दिवसापूर्वी छत्तीसगड येथील जोहर छत्तीसगड पार्टीचे अध्यक्ष अमित बघेल यांनी सिंधी समाजाविषयी व सिंधी समाजाचे आराध्य दैवत भगवान झुलेलाल यांच्या विषयी आक्षेपार्ह विधान विधान केले होते. या विधानामुळे समस्त सिंधी समाजामध्ये संतापाची लाट असून त्याचे पडसाद अहिल्यानगर येथे दिसून आले. तारकपूर येथील सकल सिंधी समाजाच्या वतीने या घटनेचा निषेध नोंदवून अमित बघेल याचा प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून पुतळ्याचे दहन करण्यात आले. त्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन निवेदन देऊन अमित बघेल याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

# मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी पदोन्नती बेकायदेशीरपणे थांबवल्याचा आरोप

### शिक्षक पात्रता परीक्षा फक्त नव्या नियुक्तीसाठी अनिवार्य; पदोन्नतीवर कायदेशीर अडथळा नाही : नागो गाणार



नगर – राज्यातील मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी या पदांवरील पदोन्नती बेकायदेशीरपणे थांबवणाऱ्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन माजी शिक्षक आमदार तथा शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री पंकज भोयर तसेच शालेय शिक्षण आयुक्त यांना पाठविले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

केंद्र शासनाने भारतीय राज्यघटनेत २००२ साली दुरुस्ती करून ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा मूलभूत अधिकार दिला. त्यानुसार 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९' अमलात आला व १ एप्रिल २०१० पासून राज्यात त्याची अंमलबजावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने १२ एप्रिल २०१२ रोजी हा कायदा वैध ठरविला आहे.

या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्याने महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ अधिसूचित केले. त्यानंतर राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्राथमिक शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा १३ फेब्रुवारी २०१३ पासून अनिवार्य करण्यात आली. तथापि, शासन निर्णय ७ फेब्रुवारी २०१९ नुसार ही परीक्षा फक्त नवीन नियुक्त होणाऱ्या शिक्षकांसाठीच अनिवार्य करण्यात आली असून, याआधी नियुक्त असलेल्या शिक्षकांना या परीक्षेची सक्ती नाही. त्यामुळे विद्यमान कार्यरत शिक्षकांना पदोन्नतीसाठी कोणतीही कायदेशीर किंवा घटनात्मक अडचण नाही, असा परिषदेचा स्पष्ट दावा आहे.

शिक्षक परिषदेच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी या पदांसाठीच्या पदोन्नत्या तातडीने थांबविल्या असून, हे पूर्णपणे बेकायदेशीर आणि नियमबाह्य कृत्य आहे. राज्यात सध्या सुमारे ५०० हून अधिक पदोन्नतीची पदे रिक्त आहेत, ज्यामुळे शाळांच्या प्रशासनिक कामकाजावर आणि शैक्षणिक गुणवत्तेवर गंभीर परिणाम होत आहे.

शिक्षक परिषदेने स्पष्ट केले की, सर्वोच्च न्यायालयाचा १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेला निवाडा विद्यमान शिक्षकांच्या पदोन्नतीला लागू होत नाही. तरीही शिक्षण विभागाने पदोन्नती रोखून शिक्षक संवर्गावर अन्याय केला आहे. या प्रकरणी शिक्षक परिषदेने राज्य सरकारला इशारा देत सांगितले आहे की, बेकायदेशीरपणे पदोन्नती थांबविणाऱ्या शिक्षण अधिकाऱ्यांविरुद्ध कठोर आणि दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. शिक्षण विभागातील अशा निर्णयांमुळे शिक्षकवर्गात प्रचंड असंतोष निर्माण झाला असून, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून पदोन्नतीची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली असल्याचे बाबासाहेब बोडखे यांनी म्हटले आहे.

# घराचा दरवाजा तोडून दागिन्यांसह रोकड चोरट्यांनी पळविली, गुन्हा दाखल

नगर – रात्रीच्या वेळी घराच्या दरवाजाची चौकट कशाच्या तरी सहाय्याने तोडून आत प्रवेश करत अज्ञात चोरट्यांनी घरातील कपाटात ठेवलेले चांदीची मूर्ती, पंच धातूची मूर्ती व रोख रक्कम असा ७० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना शहरातील सक्कर चौक परिसरात खांडेकर ट्रेडिंग कंपनी येथे १ नोव्हेंबर रोजी रात्री ७ ते २ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० या कालावधीत घडली.

याबाबत अमोल सुनिल खांडेकर (वय ३१) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे सक्कर चौक परिसरात खांडेकर ट्रेडिंग कंपनी नावाचे दुकान आहे. फिर्यादी हे १ नोव्हेंबर रोजी रात्री ७ वाजता दुकान बंद करून घरी गेले होते. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ते दुकान उघडण्यासाठी आल्यावर दुकानाच्या आतील खोलीचा दरवाजा त्यांना तुटलेला दिसला. त्यांनी आत जावून पाहणी केली असता अज्ञात चोरट्यांनी खोलीतील कपाटाचे लॉक तोडून आतील चांदीची मूर्ती, पंच धातूची मूर्ती व रोख रक्कम असा ७० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत त्यांनी कोतवाली पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. या प्रकरणी अमोल खांडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (अ), ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# नगरमध्ये ५ ते ९ नोव्हेंबर दरम्यान शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुली आंतरराष्ट्रीय मानांकित बुद्धिबळ स्पर्धा

### विजेत्याला मिळणार एक लाख रुपये तसेच उत्तेजनार्थ अनेक करंडक



नगर – शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित व अ.नगर जिल्हा बुद्धिबळ संघटना आयोजित अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धा लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्टेशन रोड, अहिल्यानगरमध्ये ५ ते ९ नोव्हेंबर पर्यंत होणार आहेत. अशी माहिती अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

या स्पर्धेत भारतातून खेळाडू बुद्धिबळ खेळण्यासाठी येणार असून आत्तापर्यंत गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू इत्यादी राज्यातून दोनशेच्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. इंटरनॅनल मास्टर आदित्य डिंगरा (हरियाणा), राहुल संगमा(गुजरात), अनुप देशमुख(महाराष्ट्र) सह अनेक दिग्ज खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत असे संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

साडेपाच वर्षाचा सर्वात बाल खेळाडू तसेच ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडू सुद्धा यात आपले बुद्धीचे बळ पणाला लावणार आहे असे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले. बुधवारी सकाळी ११.३० वाजता ही स्पर्धा सुरू होणार असून या स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या होणार आहेत. शेवटी रविवारी दुपारी दोन वाजता नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ होणार आहे. या स्पर्धेत पंच सौ. विनिता श्रोत्री (पुणे), सौ श्रद्धा विंचवेकर(पुणे), शार्दुल तापसे (सांगली), पवन राठी (पुणे) इ. स्पर्धेच्या आयोजनामध्ये सहकार्य करणारा असून त्यांना ८ सहाय्यक पंच सुद्धा मदत करणार आहेत.

संघटनेचे सदस्य सुबोध ठोंबरे, परूनाथ ढोकळे, शाम कांबळे, देवेंद्र ढोकळे, सनी गुगळे, प्रशांत गंगेकर, रोहित आडकर, मनीष जस्वनी, चेतन कड, प्रकाश गुजराती, विशाल गुजराथी, नवनीत कोठारी, स्वप्नील भागुरकर, दत्ता गाडगे, सुनील जोशी आदी स्पर्धा यशस्वी होण्या साठी प्रयत्नशील आहेत. अहिल्यानगर शहरातील खेळाडूंनी सहभागी व्हावे व पालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेत अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संपर्क- यशवंत बापट. ९३२६०९२५०१ व पारूनाथ ढोकळे. ९८५०७०४२६८.

